# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१७ – १८

**वक्तृत्व स्पर्धा**



पुढारी

# वक्तृत्व स्पर्धेत २६ विद्यार्थ्यांचा सहभाग

## खेड पंचायत समितीतर्फे स्वच्छ भारत मिशन अंतर्गत स्पर्धेचे आयोजन

**कडूस : वार्ताहर**

खेड पंचायत समितीतर्फे स्वच्छ भारत मिशन अंतर्गत तालुक्यातील कनिष्ठ- वरिष्ठ महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी स्वच्छता मित्र वक्तृत्व करंडक स्पर्धेत २६ स्पर्धकांनी भाग घेतला. गटविकास अधिकारी इंदिरा अस्वार यांनी याबाबत माहिती दिली.

पंचायत समितीच्या सभापती सुभद्रा शिंदे, जिल्हा परिषदेचे सदस्य अतुल देशमुख, गट विकास अधिकारी इंदिरा अस्वार, गट शिक्षणाधिकारी सोपान वेताळे, ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे उपअभियंता एस. आर. गायकवाड, जिल्हातज्ज्ञ सल्लागार कालूराम डांगले, पंचायत टी. पी. ओ. श्रीकांत दगाले, शिक्षण विस्तार अधिकारी जीवन कोकणे यांच्या उपस्थितीत स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले.

राजगुरुनगर येथे वक्तृत्व स्पर्धेत विजेते आणि सहभागी विद्यार्थी, परीक्षक, गटविकास अधिकारी इंदिरा अस्वार आदी.

पंचायत समितीच्या राजे शिवछत्रपती सभागृहात स्पर्धा झाल्या. कनिष्ठ आणि वरिष्ठ गटात घेण्यात आलेल्या वक्तृत्व स्पर्धेसाठी एक ते तीन क्रमांकांसाठी अनुक्रमे पाच, तीन, दोन हजारांची रोख बक्षिसे ठेवण्यात आली होती. विजेत्यांना रोख रक्कम व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

परीक्षक म्हणून एस. बी. मांजरे, डॉ. प्रा. संजय शिंदे, प्रा. यु. पी. जगताप, टी. पी. वाघुंज, धनश्री पाटील यांनी काम केले. जिल्हा परिषदेच्या वतीने प्रथम आणि द्वितीय क्रमांकात आलेल्या स्पर्धकांची जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे नियोजन पाणी व स्वच्छता कक्षप्रमुख जगदीश घाडगे, मलिका भालेराव, मंगेश थोरात, सुजाता राहणे आदींनी केले.

**विजेते स्पर्धक पुढीलप्रमाणे :**

कनिष्ठ गट - प्रथम क्रमांक : अंकिता तुकाराम शिंदे (रत्नाई महिला महाविद्यालय राजगुरुनगर), द्वितीय क्रमांक : ऋतिका अशोक कोरडे (हुतात्मा राजगुरु महाविद्यालय रा. नगर), तृतीय क्रमांक : कु. अपर्णा संतोष जोशी (महात्मा गांधी कनिष्ठ विद्यालय राजगुरुनगर).

वरिष्ठ गटातून प्रथम क्रमांक : सुषमा बाळासाहेब गाडगे (विधी महाविद्यालय, राजगुरुनगर), द्वितीय क्रमांक : कोमल दशरथ गायकवाड (हुतात्मा राजगुरु महाविद्यालय राजगुरुनगर), तृतीय क्रमांक : भास्कर दिलीप शिवले (हुतात्मा राजगुरु महाविद्यालय राजगुरुनगर).

डॉ. संजय शिंदे

प्रसिद्धी विभाग प्रमुख